औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

नगर रचना विभाग

☎: २३३३५३६-४०, २३४८००१-०५
P.B.X. २३३१२८१, २३३१२८३
Fax : (०२४०) - २३३१२१३

भू.क्र./मनपा/नरवि/ससंनर/२०१५/427 दिनांक 28/4/२०१५

प्रति,

श्री. निवृत्ती शंकर पाटील व इतर,
भू.क्र. ७२, ७३, ३७ व ७५, गट क्रमांक १३/पैकी
मौजे कांचनवाडी, औरंगाबाद.
द्वारा **श्री. राहुल एस. बडे** (इंजि),
औरंगाबाद.

विषय :- भूखंड क्रमांक ७२, ७३, ७४ व ७५, गट क्रमांक १३/पैकी मौजे कांचनवाडी, औरंगाबाद या मिळकतीच्या एकत्रिकरणा बाबत .

संदर्भ: - आपला बांधकाम परवानगीसह एकत्रिकरणाचा प्रस्ताव आवक क्रमांक ७२८/१७/२०१४-१५ दिनांक ०७/११/२०१४

महोदय,

वरील विषयी संदर्भीय प्रस्तावान्वये भूखंड क्रमांक ७२, ७३, ७४ व ७५, गट क्रमांक १३/पैकी मौजे कांचनवाडी औरंगाबाद येथील आपण प्रस्तावित केल्यानूसार मालकी हक्काच्या हद्दीपर्यंत एकत्रिकरण खालील अटींवर मान्य करण्यात येत आहे.

पुर्वस्थिती: -

अ.क्र.	मिळकत धारकांचे नाव	भू.क्र	गट नंबर	क्षेत्र
०१.	श्री. निवृत्ती शंकर पाटील	७२	१३/पैकी	२०६.१० चौ.मी.
०२.	श्री. निवृत्ती शंकर पाटील	७३	१३/पैकी	१८६.०० चौ.मी.
०३.	सौ. उषा निवृत्ती पाटील	७४	१३/पैकी	१८६.०० चौ.मी.
०४.	श्री. किरण कन्हैयालाल जैन	७५	१३/पैकी	१८६.०० चौ.मी.

एकत्रिकरण :-

अ.क्र.	मिळकत धारकांचे नाव	भू.क्र	गट नंबर	क्षेत्र
०१	**श्री. निवृत्ती शंकर पाटील, सौ. उषा निवृत्ती पाटील, श्री. किरण कन्हैयालाल जैन**	७२, ७३, ७४, ७५	१३/पैकी	**७६४.१० चौ.मी.**

अट :-

१. शेजारील मिळकतीनां बाधा निर्माण होईल असे एकत्रिकरण प्रत्यक्ष जागेवर करु नये.
२. सामासिक अंतरे नियमाप्रमाणे सोडावी लागतील.
३. सदर एकत्रिकरण हे केवळ मालकी हक्क संबंधाने करण्यात येत असून त्या संबंधाने मालकी हक्काबाबत काही वाद उदभवल्यास त्यांचे परस्पर निराकरण कराचे लागेल.
४. सदरील भूखंड हे जा.क्र./मनपा/नरवि/रेखांकन/२०९/२००९ रेखांकन क्रमांक १२६५ दिनांक १७/०६/२००९ नुसार अंतिम रेखांकनातील भूखंड आहेत.
५. मालकी हक्क, भूखंडाचे क्षेत्र, हद्दी, मालकांचे स्वाक्षऱ्या तसेच या अनुषंगाने इतर मुद्दयांबाबत भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास अथवा त्या अनुषंगाने काही न्यायप्रविष्ट/ इतर सक्षम कार्यालयात वाद निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी अर्जदार व वास्तुविशारद यांचेवर राहील त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
६. सदर मंजुरी आपण दाखल केलेल्या कागदपत्राच्या व माहितीच्या आधारावर असून ही कागदपत्रे/ माहिता चुकीची अथवा वस्तुस्थितीचा विपर्यास / दिशाभूल करणारी आहे असे सिध्द झाल्यास ही मंजुरी रद्द करण्यात येईल.
७. प्रस्तावित एकत्रिकरण नकाशा वरील मालकी हक्का बाबत, स्वाक्षरी बाबत जबाबदारी अर्जदार व वास्तुविशारद यांची राहील त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
८. तथापी उक्त आदेशात काहीही नमुद असलेतरी, स्थळावर या बदला कारणाने काही वाद उत्पन्न झाल्यास/ अथवा प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यास, मोजणीनंतर भूखंडाच्या मोजमापात बदल घडुन असल्यास त्या अनुषंगाने मान्यतेचा पूर्वलक्षी प्रभावाने पूर्न:विचार करण्यात येईल व अशा परिस्थीतीत कार्यालयाचा झालेला निर्णय अंतिम राहील, याची नोंद घ्यावी.

वरील अटींचे उल्लघंन केल्यास कोणतीही पूर्व सुंचना न देता सदर एकत्रिकरण रद्द करण्यात येईल.

सहाय्यक संचालक नगर रचना,
महानगरपालिका, औरंगाबाद.

औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

"बां ध का मा चा प र वा ना"

बुक नंबर :- 259 **COMMENCEMENT CERTIFICATE** अ.क्र. 8458

परवाना क्रमांक 32/2015-16

फाईल क्रमांक 728/17/2014-15 दिनांक 02/5/2015

परवाना धारण करणाऱ्याचे नांव :- श्रीमती/श्री. निवृत्ती शंकर पाटील, सो. उषा निवृत्ती पाटील व श्री किरण कन्हैयालाल जैन.

सर्वे क्र./गट क्र. 13 पैकी भू.क्र. 72 ते 75 मोहल्ला :- काचनवाडी औरंगाबाद

औरंगाबाद महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम २५३ व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ अन्वये व तत्संबंधित नियमास अनुसरून खालीलप्रमाणे बांधकामाची/दुरूस्तीची परवानगी दिली जाते, सदरील परवान्याचा अंमल आज पासून पुढील एक वर्षापर्यंत राहील. बांधकाम पूर्ण झाल्या बाबत लेखी माहिती तपासणीसाठी या कार्यालयात पाठविण्यात यावी नगर रचनाकार यांनी लाल रंगाने दुरूस्ती/मान्य केलेल्या नकाशा प्रमाणे बांधकामाची परवानगी खालील अटीवर दिली जाते.

०१. सदर बांधकाम परवाना हा विकास परवानगीच्या अनुषंगाने दिला जात आहे. या मध्ये नमुद केलेल्या भुखंडासंबंधी कोणाचे मालकी हक्क, इजमेंट हक्क, अगर इतर कोणत्याही हित संबंधात बाधा निर्माण होत असतील तर त्यांनी आपल्या तक्रारी/वाद न्यायालयामार्फत परस्पर दूर करून घ्याव्यात या संबंधाने उद्भवणाऱ्या कोणत्याही बाबीची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेवर राहणार नाही.

०२. शेजाऱ्याच्या कोणत्याही प्रकारच्या हक्कास बाधा निर्माण होईल असे बांधकाम करण्यात येवू नये.

०३. प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यापुर्वी नगर भूमापन अधिकारी/तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांच्या मार्फत भूखंड आखणी करून घेणे अर्जदार व वास्तुविशारद यांच्यावर बंधनकारक राहील.

०४. सदर भूखंडास/मिळकतीस मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत म.ज.म.अधि.१९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषिक वापराचा आदेश क्र. रानआर-909/e3 दिनांक 3/8/e3 नुसार प्राप्त आहे.

०५. बांधकाम साहित्य व माती महानगरपालिकेच्या रस्त्यावर ठेवू नये याबाबत दिनांक 2/3/2015 रोजी दिलेले हमीपत्र अर्जदारास बंधनकारक राहील.

०६. या कार्यालयाचे संबंधित अधिकारी जागेवर प्रत्यक्ष पाहणीसाठी आले असता त्याचे अवलोकनार्थ मंजूरीचे संबंधीत कागदपत्रे दाखविण्यात यावे.

०७. जोत्या पर्यंत **(Plinth Level)** चे बांधकाम झाल्यानंतर सदरहु कार्यालयास त्याप्रमाणे अधिकृत वास्तुविशारदच्या प्रमाणपत्रासह कळवावे व **Plinth Level Comletion** प्रमाणपत्र कार्यालयातर्फे घेणे आवश्यक आहे.

०८. मंजूर बांधकाम नकाशाच्या विरूद्ध जर बांधकाम करण्यात आले तर आपणा विरूद्ध महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम-४३ सह ५२, कलम-५४, कलम-५३ प्रमाणे पूढील कार्यवाही करण्यात येईल.

०९. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २६३ अन्वये बांधकाम पुर्ण झाल्या नंतर भोगवटा प्रमाणपत्र **(Occupancy Certificate)** घेण्यात यावे व त्या नंतरच इमारतीचा वापर सुरू करावा नसता आपल्या विरूद्ध म.प्रा.नि.व.न.र.अधि १९६६ चे कलम -५३ अन्वये पूढील कार्यवाही करण्यात येईल.

१०. भोगवटा प्रमाणपत्र घेतेवेळी महानगरपालिका पस्वानाधारक प्लंबरने जलनिःसारण जोडणी बाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

११. छतावर पडणाऱ्या पावसाचे पाणी संकलीत करून विंधन विहीर असल्यास त्यांचे पुर्नभरण करावे. जेथे विंधन विहीर नाही अशा ठिकाणी सोकपीट (शोशकुप) तयार करून त्यामध्ये त्याचा निचरा करावा.

१२. शहर विकास निधी रक्कम रू. 75900/- च.क्र. 2493 दिनांक 2/3/2015 नुसार जमा केली आहे.

१३. प्रिमियम रक्कम रू. — च.क्र. — दिनांक /—/20 नुसार जमा केली आहे.

१४. विकास खर्च निधी रक्कम रू. — च.क्र. — दिनांक /—/20 नुसार जमा केली आहे.

१५. जमिन विकास शुल्क रक्कम रू. — च.क्र. — दिनांक /—/20 नुसार जमा केली आहे.

१६. भोगवटा प्रमाणपत्र घेणे पूर्वी समासातील अंतरामध्ये कमीत कमी (08) झाडे लावून त्यांचे संगोपन करावे.

१७. जागेवरील झाडे तोडावयाची झाल्यास प्रथम सक्षम प्राधिकरणा मार्फत परवानगी घेण्यात यावी.

१८. जागेवर विद्युत वाहिनी असल्यास ती प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यापुर्वी संबंधीत खात्याकडून काढून घ्यावी नंतरच बांधकाम सुरू करावे.

१९. भोगवटा प्रमाणपत्र घेण्य.पूर्वी / जोत्याचे प्रमाणपत्र घेण्यापूर्वी स्वतंत्र पी.आर.कार्ड/एकत्रित पी.आर.कार्ड व टोच नकाशा सादर करावा.

२०. सद्यस्थितीत महानगरपालिकेस पाणी पुरवठा करणे शक्य नाही, जेव्हा महानगरपालिकेकडे अतिरिक्त पाणी उपलब्ध होईल त्यावेळी आपणास पाणी पुरवठा करणे शक्य होईल. तरी पाणी पुरवठा बाबत अर्जदारास आग्रह धरता येणार नाही.

२१. शहर भूखंड ~~ये~~ एकत्रिकरण आदेश क्र. ~~०~~ दिनांक 14/1/2015

२२. अन्वये देऊन दिलेआहे.

मा.आयुक्तांची तजवीज दिनांक :07/03/2015

आयुक्त
औरंगाबाद महानगरपालिका,
यांचे करीता.

प्रतिलिपी, :-०१ मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

०२ प्रशासकीय अधिकारी विभाग क्रमांक ~~अ, ब, क, ड, ई~~ व फ यांना माहितीस्तव योग्य कार्यवाहीस्तव दिली जाते.

फ/1201